# कोळी मल्हार आदिवासी जमातीचा चौकाचा विधी एक संस्कारशील विधी

श्री. अशोक खंडू मोरमारे
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग
शिवराज महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.
इमेल:akmormare@gmail.com

डॉ. डी.एम. पाटील
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग प्रमुख
डॉ. घाळी महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
इमेल:dattapatil1170@gmail.com

प्रस्तावना:

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशामध्ये विविध प्रांत, प्रदेश, भाषा व नैसर्गिक विविधता पाहावयास मिळते. त्याचबरोबर सामाजिक विविधताही या देशामध्ये पाहावयास मिळते. या सामाजिक विविधतेतूनच ब्राह्मण, मराठा, वाणी, मारवाडी, महार, मांग, चांभार, धनगर, शिंपी, न्हावी, माळी लोहार, सुतार, सोनार यासारख्या विविध अठरापगड जातीजमातींचे वास्तव्य ह्या भूमीमध्ये असलेले दिसते. या सर्व अठरापगड जातीजमातींची आपली स्वत:ची संस्कृती परंपरेने चालत आलेली पाहावयास मिळते. प्रत्येक समाज आपल्या पूर्वापार परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीनुसार जीवन जगताना दिसतो. प्रत्येकजण आपल्या संस्कृतीचे जतन करत असतो. ह्यासाठी तो अधिकाधिक धडपडत असतो. संस्कृतीच्या जतनातूनच समाजाच्या जीवनाला आकार येत असतो. समाजातील पुढील पिढीसाठी आदर्शवत ठरतील अशा नव्या जीवनमूल्यांची रुजवात या संस्कृती जतनातून होताना दिसते.

याबरोबरच महाराष्ट्रामधील विविध जिल्ह्यामध्ये जवळजवळ ४७ आदिवासी जमातींचे वास्तव्य आढळते. यामध्ये आंध, भिल्ल, मावची, कोरकू, माडिया गोंड, कोलाम, कोकणा, वारली, कोळी महादेव, कातकरी, ठाकर, कोळी मल्हार, दुबळा, धानका, हलबा, पावरा वगैरे प्रमुख आदिवासी जमाती म्हणून विचारात घेतल्या गेल्या आहेत. या आदिवासी जमातींची आपापली स्वतंत्र संस्कृती असलेली दिसते. या सर्व आदिवासी जमाती आपापल्या संस्कृतीनुसार जीवन जगत असतात. आदिवासींची संस्कृती ही निसर्गनिर्भर संस्कृती आहे. या विविध आदिवासी जमातींपैकी कोळी मल्हार आदिवासी जमातीच्या संस्कृतीचा विचार केला असता. या जमातीची संस्कृती ही निसर्गनिर्भर व मानवतावादी विचारसरणी जपणारी संस्कृती आहे, असे म्हणता येते.

कोळी मल्हार आदिवासी जमातीचे वास्तव्य महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, मुरबाड आणि पालघर जिल्ह्यातील वाडा, वसई, विक्रमगड, पालघर, डहाणू, जव्हार आणि मोखाडा या तालुक्यांमध्ये अधिक प्रमाणात आहे. या जमातीचा शेती हा प्रमुख व्यावसाय आहे. अल्पभूधारक शेतकरी शेतमजुरीचा व्यावसाय करतात. तसेच जंगलामध्ये मध गोळा करणे, पळसाची पाने गोळा करणे असे छोटे मोठे व्यावसाय करतात. या जमातीच्या लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने पूर्वापार परंपरेने चालत आलेल्या विविध रुढी, परंपरा ते अधिक जपताना दिसतात. आपल्या संस्कृतीचे आपणच जतन केले पाहिजे. असा ठाम विश्वास त्यांच्या लोकजीवनामध्ये रुजला आहे. त्यामुळे ते आपल्या संस्कृती जतनाला अधिक प्राधान्य देताना दिसतात. पूर्वापार परंपरेने चालत आलेली संस्कृती ही आपल्या जीवनाचा एक भाग आहे तो वाडवडिलांनी जपलेला एक ठेवा आहे. तो आपण जपला पाहिजे. या भावनेने ते आपल्या संस्कृतीकडे पाहतात. त्यांच्या या संस्कृतीच्या माध्यमातूनच त्यांचे दैनंदिन जीवनमान चालत असते. त्यांची ही संस्कृती विविध तऱ्हेचे विधी, रुढी, परंपरा, सण, उत्सव, लोकगीते, लोककथा, लोककला, लोकनृत्य, विविध आचार – विचार,

PRINCIPAL
Shivaraj College of Arts, Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)

म्हणी, वाक्प्रचार या आणि अशा विविध घटकांच्या माध्यमातून जपली जाताना दिसते. या संस्कृतीच्या माध्यमातून आपले वेगळेपण ते जपताना दिसतात.

या जमातीचा लग्नविधी हा त्यांच्या लोकसंस्कृतीचा एक महत्वाचा घटक म्हणून विचारात घेतला जातो. हा लग्नविधी विविध उपविधींनी साकार केला जातो. या उपविधींपैकी एक असलेला उपविधी म्हणजे 'चौकाचा विधी' होय. लग्नविधी सुरळीत पार पडावा म्हणून हा चौकाचा विधी केला जातो. यासाठी लग्नघरामध्ये दर्शनी भिंतीवर एक मोठे चौकाचे चित्र काढले जाते. या चौकाला कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. या चौकाचा खोलवर व सविस्तर अभ्यास केला असता कोळी मल्हार आदिवासी जमातीच्या लोकसंस्कृतीचे वेगळेपण आपल्या लक्षात येते.

१. कोळी मल्हार जमातीच्या लग्न विधीतील चौकाचे स्वरुप

कोळी मल्हार जमातीच्या लग्न विधीमध्ये कुलदैवतांच्या उपासनेला फार महत्त्व आहे. लग्नसमारंभाचा दिवस निश्चित झाल्यानंतर मुहूर्ताच्या चार दिवस अगोदर घराच्या दर्शनी भिंतीवर किंवा कुडावर हे चौकाचे चित्र सर्वांना दिसेल अशा विचाराने काढले जाते. हा चौक काढण्यासाठी प्रथम कुडाला तांबडमाती लावून चौक तयार केला जातो. (अलिकडे सिमेंटच्या भिंती आल्यामुळे तांबडमातीचे प्रमाण कमी झाले आहे.) या चौकावर चित्र काढण्यासाठी विशिष्टप्रकारचा रंग तयार केला जातो. हा रंग तयार करण्याची एक पद्धत आहे. ती पुढीलप्रमाणे आहे. हा रंग करताना प्रथम पुरेसे तांदूळ रात्रभर भिजत ठेवले जातात. सकाळी हे तांदूळ उखळात कुटून बारीक केले जातात. तयार केलेले बारीक मिश्रण रंग म्हणून वापरले जाते. हे चित्र काढण्यासाठी केवळ सफेद रंगाचाच वापर केला जातो.

या चौकोनामध्ये कोळी मल्हार जमातीच्या दैनंदिन लोकजीवनाचे चित्रमय रेखाटन केले जाते. त्याचा पुढीलप्रमाणे विचार करता येईल. कोळी मल्हार जमातीच्या लोकांचा शेती हा प्रमुख व्यावसाय आहे. तो त्यांच्या लोकजीवनाचा एक भाग आहे. त्यामुळे शेतामध्ये करत असलेल्या विविध कामांचे चित्रण या चौकामध्ये येते. शेतात पेरणी करणे, रोपांची लागवड करणे, शेताची भांगलण करणे, रोपांची काढणी करणे, पिकांची मळणी करणे अशी विविध तऱ्हेची कामे शेतात केली जातात. या सर्व कामांचे चित्रण या चौकामध्ये केले जाते.

कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनामध्ये सामूहिक गाई–गुरे सांभाळली जातात. या जनावरांना सांभाळण्यासाठी गावचा एक गुराखी असतो. या गुराख्याचे जनावरे चारतानाचे चित्र या चौकामध्ये रेखाटलेले असते. तसेच गावचा सार्वजनिक पाणवठा, त्या पाणवठयावर पाणी भरणाऱ्या व कपडे धुवत असलेल्या आदिवासी महिलांची चित्रे त्यात रेखाटली जातात.

कोळी मल्हार जमातीचे लोक डोंगर, दऱ्यांमध्ये, नद्यांच्या परिसरामध्ये, जंगलामध्ये वास्तव्य करणारे आहेत. नद्यांच्या पाण्यामध्ये मासेमारी करणे त्यांना फार आवडते. मासेमारी करणे हा त्यांचा व्यावसाय नाही, पण




(कोळी मल्हार जमातीच्या लग्न विधीतील चौकाचे छायाचित्र)

गरज भागते म्हणून ते मासेमारी करतात. ही मासेमारी करण्यासाठी वापरली जाणारी साधने व मासेमारी करतानाचे चित्र या चौकात रेखाटले जाते. शिकार करणे कोळी मल्हार जमातीच्या लोकांना फार आवडते. या शिकारीचे दर्शनही या चौकात घडते.

कोळी मल्हार जमातीचे लोकांचे कोकण किनारपट्टी म्हणजे ठाणे आणि पालघर परिसरात वास्तव्य आहे. कोकण परिसरात नारळ, ताड व शिंदीची झाडे अधिक प्रमाणात पाहावयास मिळतात. नारळाच्या झाडावरुन नारळ काढणे, ताडाच्या झाडावरुन ताडफळे किंवा शिंदीच्या झाडावरुन नीरा, ताडी काढले जातात. हे काम जी व्यक्ती करते त्या व्यक्तीला कोळी मल्हार बोलीमध्ये 'भंडारी' असे म्हणतात. या भंडारीचे चित्र या चौकामध्ये काढलेले असते. हा भंडारी कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनाचा एक घटक असतो.

नृत्य करणे ही कोळी मल्हार जमातीच्या लोकांची आवडती गोष्ट आहे. त्यातल्यात्यात तारपा नृत्य करणे त्यांना फार आवडते. नृत्य कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनाचा एक भाग आहे. याचे चित्र या चौकामध्ये येते. त्याचबरोबर टिपरीनृत्य, गौरी नृत्य यांचेही चित्र या चौकात येते.

दारु आणि कोळी मल्हार जमातीचे लोक यांचे अगदी जवळचे नाते आहे. या जमातीच्या प्रत्येक विधीमध्ये दारुची धार ही सोडावीच लागते. त्याशिवाय तो विधी पूर्ण होत नाही. म्हणजेच दारु त्यांच्या जीवनाचा एक भाग बनलेली आहे. परंतु दारु पिणे माणसाच्या आरोग्यास हानिकारक असतानाही ती त्यांच्या लोकजीवनाचा एक भाग बनली आहे. म्हणूनच की काय या दारु पिणाऱ्या व्यक्तीचे चित्र या चौकात येते.

गौरीचा सण हा कोळी मल्हार जमतीचा एक महत्वाचा सण होय. हा सण हे लोक गोठया आनंदाने साजरा करतात. दरवर्षी ते गौरीची प्रतिस्थापना करतात. या गौरीचे चित्रही या चौकामध्ये येते. त्याचबरोबर मोराचे पंख 'हिरवा' या कुलदैवताचे प्रतिक म्हणून पूजले जाते. म्हणून मोराचे चित्र या चौकात रेखाटले जाते.कोळी मल्हार जमातीच्या लोकांचे जीवन हे निसर्गनिर्भर असे जीवन आहे. त्यामुळे ते कोणत्याही कामाची अथवा विधीची सुरुवात करताना प्रथम निसर्गाची पूजा करतात. सूर्य, चंद्र व धरती यांना ते निसर्गदेवता मानतात. या निसर्ग देवतांची पूजा घडावी म्हणून त्यांची चित्रे या चौकात रेखाटने हे चित्रकार कधीही विसरत नाहीत.

लग्नसंमारंभात कुलदैवतांची पूजा करण्यासाठी या चौकाची रचना केलेली असते. त्यामुळे नारनदेव, कणसरी, गावदेवी, वाघोबा, चेडा या कुलदैवतांची चित्रे या चौकात रेखाटली जातात. या कुलदैवतांना साक्षी मानूनच लग्नातील सर्व विधी केले जात असतात.

या चौकामध्ये वधूवरांना घोड्यावर बसले असल्याचे चित्र दाखविलेले असते. या चित्राला वधूची पाठवणी व स्वागत अशा अर्थाने विचारात घेतले जाते. म्हणजेच मुलगीचे लग्न असेल तर घोडा बाहेर जात असल्याचे अन् मुलाचे लग्न असेलतर घोडा घरात येत असल्याचे चित्र रेखाटलेले असते. म्हणजे वधूची सन्मानाने पाठवणी व सन्मानाने स्वागत करण्याची रीत कोळी मल्हार जमातीच्या लोकसंस्कृतीमध्ये पूर्वापार परंपरेपासून चालत आलेली आहे. याचाच अर्थ स्त्रीचा गौरव करणे, तिला सन्मानाने वागविणे, तिचा आदर करणे या बाबी कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनात अधिक जपल्या जात असलेल्या दिसतात. एकूणच या चौकातील चित्रमय रचनेतून कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनाचे यथासांग दर्शन घडते.

कोळी मल्हार जमातीच्या लग्न समारंभात कुलदैवतांची पूजा करणे ही परंपरा कटाक्षाने पाळली जाते. यानुषंगाने चौकाचा विधी करताना कुलदैवतांना सन्मान दिला जातो. यासाठी तेल पाडण्याचा विधी केला जातो. हा तेल पाडण्याचा विधी करताना कुलदैवतांना बोलविले जाते. कशासाठी? तर अमूक अमूक कुटुंबामध्ये लग्नसोहळा आयोजित केला आहे. या लग्नसोहळयासाठी आणलेली बाशिंगे, मंगळसूत्र, शालू वगैरे वस्तू कुलदैवतांना दाखवून घेतल्या जातात. ह्या सर्व वस्तू पाहण्यासाठी आलेल्या कुलदैवतांच्या नावाने तेल पाडून त्याच्यावर हा लग्नसोहळा पार पाडण्याची जबाबदारी सोपविली जाते. या

60

लग्नसोहळयामध्ये कोणत्याही प्रकारचे विघ्न येता कामा नये. आणि आलेच तर त्याचे निवारण या देवता करतात. असा ठाम विश्वास या कोळी मल्हार जमातीचा आहे.

दुसऱ्या दिवशी लग्नसमारंभापूर्वी बाशिंग बांधण्याचा विधी केला जातो. हा विधी चौकासमोरच केला जातो. या विधीसाठी गावातील पंचाना बोलविले जाते. यावेळी चौकासमोर मामा भाचीला म्हणजेच वधूला आपल्या मांडीवर घेऊन बसतो. गावातील पंचमंडळी बाशिंग प्रथम जमलेल्या गावकऱ्यांना दाखवितात. नंतर नवरीच्या बापाची परवानगी घेतात. त्यावेळी ते म्हणतात,'' नवरीचे बाबा, नवरीला बाशिंग बांधायचे का?'' नवरीच्या बापाने 'हो' म्हटले, की पंच नवरीला सांगतात,''नवरी ऐक, आता तुला पाच पंचात उठवलाय, बसवलाय. तू इकडच्या चहाड्या तिकडे अन् तिकडच्या चहाड्या इकडे सांगू नको. तुमच्यात काही वाद झालाच, तर तो आपापसात मिटवून घे. ज्या चुलीत तुला दिली आहे, त्याच चुलीत तू नांदायचे आहे.'' त्याचबरोबर 'आईवडिलांना तू विसरु नकोस. त्यांचा तू चांगला सांभाळ कर.' अशी शिकवण हे पंच नवरीला देतात.

नववधू ही लग्न होऊन सासरी जाणार आहे. ती उद्यापासून आपला नवा संसार थाटणार आहे. हा तिचा संसार चांगला चालला पाहिजे. तो चांगला चालावा म्हणून नवरीने सासर आणि माहेर या दोन घरांमध्ये कोणत्याही प्रकारचा विसंवाद घडू नये, याची काळजी घेतली पाहिजे. ही तिची जबाबदारी आहे. ती जर सलोख्याने वागली नाही, ती चुकीचे वागली, तर दोन्ही कुटुंबामध्ये वाद झाल्याशिवाय राहणार नाही. परिणामी तिचा संसार यामुळे मोडू शकतो. म्हणूनच नवरीचा संसार मोडू नये. तिचा संसार सुखाचा व्हावा, तिच्या संसाराची भरभराट व्हावी, यासाठी गाववाले तिला ही शिकवण देत असतात. गावपंचायतीने चौकाच्या समोर, चौकातील सर्व कुलदैवतांना व रुढी, परंपरांना साक्षी मानून नवरीला माहेराचा हा एक प्रकारचा संस्कारच दिलेला असतो. या संस्कारवरच नवरीचा संसार यशस्वी होत असतो. ही संस्काराची शिदोरी घेऊनच नवरी सासरी जात असते. जी तिला आयष्यभर सावरत असते.

लग्नविधीतील या चौकामध्ये कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनातील विविध घटना, प्रसंगाचे चित्रमय दर्शन घडविलेले असते. हे संपूर्ण लोकजीवन नवरीच्या संस्काराच्या दृष्टीने आपणास विचारात घेता येते. या सर्व बाबी सासरी गेल्यानंतर तिच्या जीवनाचा भाग होणाऱ्या असतात. म्हणून आपण या जीवनाशी एकरुप झाले पाहिजे. यातूनच माझे जीवन फुलत जाणार आहे. याची तिला जाणीव होते. हा एक पूर्वपरंपरेचा अनुभव नववधूच्या जीवनावर एक प्रकारचा संस्कारच करत असतो. या सर्व विवेचनावरुन आपणास असे म्हणता येते, की कोळी मल्हार जमातीच्या लग्नविधीतील चौकाच्या चित्रमय दर्शनाने आणि चौकाचा विधी साकारण्याने नववधूला आपले नवे आयुष्य जगण्याचे विविध मूलमंत्र सापडतात. त्यामुळे ती आपला संसार यशस्वीपणे सांभाळते. आपल्या संसारामध्ये चैतन्य निर्माण करते.

२. निष्कर्ष :

- कोळी मल्हार आदिवासी जमातीचे लोक चंद्र, सूर्य व धरती या निसर्गदैवतांना अधिक भजतात. यामुळे त्यांचे जीवन हे निसर्गनिर्भर असलेले दिसते.
- लोकजीवनातील विविध विधी हे कोळी मल्हार जमातीच्या जीवनाचा एक भाग आहेत.
- शिक्षणाचा अभाव असल्यामुळे कोळी मल्हार जमातीच्या लोकजीवनामध्ये अनिष्ट प्रथांना अधिक जपलेले दिसते.
- लोकसंस्कृतीमधून संस्कारांची शिकवण देऊन आदर्श जीवन जगण्याचा मार्ग शोधला जातो.